अधिसुचना

क्रमांक : ११६/२०२४ दिनांक : २६/०९/२०२४

विषय :- राजीव गांधी विज्ञान महाविद्यालय,मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयातील विद्याशाखेच्या दुरुस्तीबाबत...

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक-२००८/(१८/०८)/मशि-३,दि.३०-०१-२००८
२.शासन आदेश क्र.एनजीसी-२००८/(२२१/०८)/मशि-३,दिनांक १८/६/२००८
३. शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.४९/मशि-४,दि.०६/१/ २०२३
४.विद्यापीठ अधिसुचना क्र.१९/२०२३,दि.०९/२/२०२३
५. शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.४९/मशि-४,दि.११/९/२०२४

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी शासन निर्णय क्रमांक-२००८/(१८/०८)/मशि-३,दि.३०-०१-२००८ अन्वये श्री.विठ्ठल बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चिंचोली बोरे,मु.पो.चिंचोली बोरे,ता.मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित राजीव गांधी विज्ञान महाविद्यालय,शिक्षक कॉलनी, डोणगांव रोड, मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयास बी.एस्सी.बायोइन्फॉर्मेटिक्स या विद्याशाखेसह व्यावसायिक म्हणुन मान्यता दिली होती. त्याअनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१६८०/२००८,दि.०३/१०/२००८ अन्वये सदर नविन महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण देण्यात आले होते.

शासन निर्णय दि.६/१/२०२३ मधील निर्देशान्वये विद्यापीठ अधिसुचना क्र.१९/२०२३, दि.९/२/२०२३ अन्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आली होती. शासन निर्णय दि.११ सप्टेबर २०२४ च्या नविन निर्देशान्वये सुधारीत अधिसुचना काढण्यात येत आहे.त्यामुळे दि.०९/२/२०२३ ची अधिसुचना रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.४९/मशि-४,दि.११ सप्टेंबर २०२४ अन्वये श्री.विठ्ठल बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चिंचोली बोरे,मु.पो.चिंचोली बोरे,ता.मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित राजीव गांधी विज्ञान महाविद्यालय, शिक्षक कॉलनी, डोणगांव रोड, मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयाच्या **बी.एस्सी.बायोइन्फॉर्मेटिक्स या विद्याशाखेस शैक्षणिक सत्र २००८-०९ पासुन पारंपारीक म्हणुन समजण्यास मान्यता देण्यात येत आहे.** सदर शासन आदेशातील नमुद इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल होणार नाही, असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****